ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख १ एप्रिल, १९५९ | अंक १३

## विविध माहिती

**विम्याचा धंदा वाढविण्याची योजना**— आयुर्विमा कॉर्पोरेशननें विम्याचें काम वाढविण्याची पंचवार्षिक योजना तयार केली आहे. कामाची वाढ दरसाल पुढीलप्रमाणें करण्याचे ठरविण्यांत आलें आहे. १९५९ सालीं ४१५ कोटी; १९६० साली ५२५ कोटी; १९६१ सालीं ६६५ कोटी, १९६२ सालीं ८२० कोटी आणि १९६३ सालीं १,००० कोटी रुपये ग्रामीण भागांतून विम्याचें काम मिळविण्यासाठी अधिक जोराचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत.

**मुंबई ते रोम नवी सर्व्हिस**—मुंबईहून रोमला व परत अशा प्रवासाची सर्व्हिस इटलींतील एका विमान कंपनीनें चालू केली आहे. हिंदुस्थानांत उतारूंची वहातूक करणारी ही १८ वी परदेशीय विमान कंपनी आहे. रोम ते मुंबई प्रवास करण्यास विमानांना १३॥ तास लागतील. प्रवास आठवड्यांतून दोनदांच करण्यांत येईल.

**रॉकेल तेलाची आयात**—रुमेनियाकडून रॉकेल व डिझेल आयात करण्याची तयारी एका भारतीय कंपनीनें दाखविली असून मध्यवर्ती सरकार ह्यासंबंधीं विचार करीत आहे. १९५९ मध्यें ही कंपनी रुमेनिआकडून १९,००० टन रॉकेल व ६,००० टन हायस्पीड डिझेल तेल आयात करूं शकेल. इराणच्या आखाताकडून येणाऱ्या आयातीपेक्षा वरील आयात स्वस्त पडेल काय, हा खरा प्रश्न आहे.

**जर्मनीमधील बोट-बांधणी**—जर्मनीमधील बोट बांधणाऱ्या कारखान्यांनीं आपल्या गिऱ्हाइकांकडून किंमत घेण्याच्या कामीं अधिक सवलती देण्यास प्रारंभ केला आहे. बोट घेणाऱ्याला आतां ती ताब्यांत मिळेपर्यंत कांहींहि द्यावें लागणार नाहीं. बोट ताब्यांत घेण्याच्या वेळीं एकपंचमांश रक्कम व नंतर ५ वर्षांत बाकीची रक्कम अशा पद्धतीनें किंमत घेण्यांत येणार आहे. पूर्वीच्या पद्धतींत करार केल्याबरोबर हप्ते सुरू होत असत.

**परदेशांतून पुस्तकांची आयात**— १९५७-५८ सालीं भारतानें अमेरिकेकडून ६२·९२ लाख रुपये किंमतीचीं पुस्तकें आयात केलीं. ब्रिटनकडून ४९·९७ लाख रुपयांचीं पुस्तकें आयात करण्यांत आलीं आणि रशिआकडून आयात केलेल्या पुस्तकांची किंमत फक्त १३,००० रुपये झाली. पुस्तकांच्या आयातीचा व्यापार करणाऱ्यांबरोबरच, वाचनालयें, तांत्रिक व शिक्षण संस्था, ह्यांच्या आयातीच्या मागण्यांनाहि परवाने देण्यांत आले.

**विमा कॉर्पोरेशनच्या नौकरांची सोय**— कोइमतूरजवळ आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या नौकरांची राहण्याची सोय करण्यासाठी सहकारी घरयोजना अंमलांत आणण्यांत येत आहे. ह्या वसाहतीचा कोनशिला-समारंभ साजरा करतांना कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांनीं असें जाहीर केलें कीं, विमा नौकरांच्या राहाण्याची सोय करण्यासाठी येत्या पांच वर्षांत कॉर्पोरेशन १२ कोटी रुपये खर्च करील.

**साखर कामगारांना बोनस**— इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनची बिहार शाखा व इंडिअन नॅशनल शुगर मिल्स वर्कर्स फेडरेशन ह्या संघटनांत बोनससंबंधीं करार झाला आहे. कराराप्रमाणें बिहारमधील साखरेचे १४ कारखाने कामगारांना सुमारें १० लाख रुपये बोनस म्हणून वाटतील. कारखान्यांतील कामगारांची संख्या १४,००० आहे.

**जलमार्ग वाढविण्याची जरूरी**—नॉटिकल अँड एंजिनिअरिंग कॉलेजच्या वर्षदिनानिमित्त बोलतांना, डॉ. रामस्वामी मुदलियार ह्यांनीं भारत व इतर देश ह्यांच्या दरम्यान अधिक जलमार्ग सुरू करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. असे मार्ग उघडल्याशिवाय हिंदच्या निर्यात व्यापाराची प्रगति कठीण होत जाईल, असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें. व्यापारी बोटींवर काम करण्यासाठी तरुण लोक पुढें येत आहेत, ह्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

**संततिप्रतिबंधक गोळ्या**— कलकत्ता येथील जंतुविषयक संस्थेनें संततिप्रतिबंधक गोळ्या शोधून काढल्या आहेत. ह्या गोळ्यांच्या प्रभावीपणाची परीक्षा कलकत्ता येथील सार्वजनिक आरोग्य संस्था करीत आहे. गोळ्या यशस्वी ठरल्यास त्या संततिप्रतिबंधक योजनेसाठी वापरण्यांत येतील. एका गोळीला १० नये पैसे पडतील. एका वेळीं दोन गोळ्या द्याव्या लागतील.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि बँक ऑफ कराड लि., कराड

| | | रु. |
|---|---|---|
| अहवालाचे वर्षी बँकेस तिच्या व्यवहारांत इतका निव्वळ नफा झाला आहे. या रकमेंतून | | ३८,५५९ |
| | रु. | |
| रिझर्व्ह फंड | ८,००० | |
| इन्व्हेस्टमेंट फ्लक्च्युएशन फंड | ५०० | |
| डिव्हिडंड इक्वलायझेशन फंड | १,००० | |
| कॉन्टिन्जन्सी फंड | १,००० | |
| इन्कमटॅक्स तरतूद | १८,००० | २८,५०० |
| या सर्व रकमा वर्ग केल्यावर इतकी रक्कम शिल्लक राहते ... | | १,००५९ |
| यामध्यें गेल्या वर्षींचे नफ्यापैकी शिल्लक असणारी रक्कम ... | | ४२७ |
| मिळविल्यानंतर ... | | १०,४८६ |

इतकी रक्कम वाटण्याकरितां उपलब्ध राहते. या रकमेची वाटणी खालीलप्रमाणें केली आहे.

| | |
|---|---|
| ता. ३१।१२।१९५८ असेर संपलेल्या वर्षासाठी शेअरच्या भरलेल्या रकमेवर प्रमाणतः | |
| द. सा. द. शे. ४½ रु. प्रमाणें इन्कमटॅक्स माफ | रु. |
| डिव्हिडंड देणेसाठी ... ... | १०,३०० |
| व पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढली जाणारी रक्कम | १८६ |
| एकूण रक्कम रु. | १०,४८६ |

अहवालाचे वर्षी बँकेच्या कारभारांत समाधानकारक प्रगति झाल्याचें दिसून येतें. बँकेकडील ठेवीमध्यें रु. ५ लक्षांपेक्षा अधिक ठेवींची वाढ झाली आहे. गेल्या वर्षींचे अहवालांत नमूद केलेप्रमाणें बँकेची नवीन इमारत मार्च १९५८ मध्यें पूर्ण झाली व बँकेचें ऑफिस ता. २१ मार्च, १९५८ रोजीं गुढीपाडव्याचे सुमुहूर्तावर या नवीन इमारतींत नेणेंत आलें. बँकेनें या नव्या इमारतींत तळघरामध्यें अद्यावत् पद्धतीच्या सेफ् डिपॉझिट व्हॉल्टची सोय केली आहे. या नवीन इमारतीचें उद्घाटन ना. मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं ता. २१ एप्रिल, १९५८ रोजीं केलें. याच वेळीं बँकेचे चेअरमन श्री. ल. म. तथा नानासाहेब देशपांडे यांच्या तैलचित्राचें अनावरण मुख्य मंत्र्यांचे हस्तें करण्यांत आलें.

श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे हे वार्धक्यामुळें तारीख १९ मे १९५८ रोजीं बँकेच्या डायरेक्टरच्या व चेअरमनच्या जागेवरून निवृत्त झाले. श्री. नानासाहेब देशपांडे हे बँकेच्या स्थापनेपासूनचे डायरेक्टर व चेअरमन होते. त्यांच्या कर्तबगार नेतृत्वामुळें बँक अल्पावधींत एवढी प्रगति करूं शकली. त्यांच्या या सेवेबद्दल बोर्डानें अहवालांत ऋण व्यक्त केलें आहे.

बँकेचें वसूल भांडवल २,२९,८८० रु. असून रिझर्व्ह आणि इतर फंड १,००,३०९ रु. चे आहेत. सुमारें ३० लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें सुमारें १७ लक्ष रु. चीं कर्जे दिलेलीं असून ११ लक्ष रु. चे रोखे तिचेजवळ आहेत.

## तिसऱ्या योजनेंत महागाई भडकण्याचा संभव !

### गांवोगांवच्या संस्था-संघटनांना नि कार्यकर्त्यांना विनंती

महागाईची झळ गरीब आणि मध्यम वर्गाला आजच कमालीच्या तीव्रतेनें जाणवत आहे. दारिद्र्य, बेकारी, भाववाढ, यांचे पायीं घडणाऱ्या आत्महत्या, चोऱ्यामाऱ्या, गुन्हे, यांचे रिपोर्ट वृत्तपत्रांतून वाढत्या प्रमाणांत वाचण्यास मिळत आहेत. अशा स्थितींत तृतीय पं. वा. योजनेच्या ज्या गर्जना सध्यां ऐकावयास येतात, त्यांच्या स्वरूपलक्षणांवरून ही महागाई पुढील २।४ वर्षांत अधिकच भडकेल, वाढेल, आणि असह्य रूप धारण करील, अशीं लक्षणें दिसतात. मागील अनुभवावरून पाहतां महागाई आटोक्यांत ठेवण्याबाबत सरकारनें कितीहि आश्वासनें दिलीं तरी तीं तोटकीं, पोकळ, अपुरीं ठरतील आणि गरीब जनतेच्या कपाळीं वाढत्या हालअपेष्टा, कदाचित् 'यमयातना' येतील अशी खास भीति वाटते. या परिस्थितीला जागरूकतेनें सावधानतेनें पायबंद घालण्याचे प्रयत्न सर्व जाणत्या संस्था-संघटनांनीं नि कार्यकर्त्यांनीं एव्हांपासून चालविले पाहिजेत. नाहींपेक्षा आयत्या वेळच्या हालचालींचा चळवळी-वळवळींचा कांहीं उपयोग न होतां परिस्थिति सर्व बाजूंनीं आटोक्याबाहेर जाण्याचा संभव दिसतो. आमची महाराष्ट्रांतील सर्व संस्था-संघटनांना ( नि कार्यकर्त्या सज्जनांना ) विनंती आहे कीं, त्यांनीं परिस्थितीचें गांभीर्य ओळखून आपला जनतासंपर्क आणि आपसांतील संपर्क एव्हांपासून वाढवावा, बळकट करावा. तृतीय पंचवार्षिक योजनेचा आराखडा जेव्हां प्रसिद्ध होईल तेव्हां तिच्या स्वरूपलक्षणांची वेळींच आपसांत नि सामुदायिक चर्चा घडवून सरकारकडे आपापलीं अभिमतें कळवावीं. तसेंच आमच्याहि संस्थेकडे वेळींच पत्रव्यवहार करून कांहीं सल्ला-मसलत मार्गदर्शन मिळवावें. ( यासंबंधीं कांहीं खास प्रचारपत्रकें संस्था वेळोवेळीं छापविण्याचे विचारांत आहे. त्यांतील पहिलें पत्रक मागविणारांना एप्रिलचे १० तारखेचे सुमारास विनामूल्य अगर नाममात्र किंमतीस पाठविलें जाईल. ) संस्थेकडे स्वतःच्या सूचनाहि कळवाव्या. भारतीय जनतेच्या गरजांचें आशा-अपेक्षांचें नि विचारांचें खरें प्रतिबिंब जर आणि जितकें तृतीय योजनेच्या आराखड्यांत पडेल तर आणि तितकें ह्या योजनेचें स्वरूप जनतेस सुसह्य आणि कल्याण-साधक होईल. यासंबंधीं १५ न. पै. चीं तिकिटें पाठवून खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा, अशी विनंती आहे. चिटणीस, मध्यवर्ति जनसेवा मंडळ, ४५, अहमद सेलर चाळ नं. ३, नायगांव, दादर, मुंबई १४.

**धान्याच्या सांठवणीचा अभ्यास**—मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेतकी खात्याचे दोन अधिकारी कॅनडास जात आहेत. कॅनडांत अन्न-धान्याच्या सांठवणीचा प्रश्न कशा रीतीनें सोडविला जातो, त्याचा ते अभ्यास करणार आहेत. त्यांचा कॅनडांतील अभ्यासक्रम ६ ते १० महिन्यांचा आहे. परत आल्यावर ते आणखी लोक शिकवून तयार करतील.

**गोध्रा येथें औद्योगिक शाळा**—मुंबई सरकारनें गोध्रा येथें एक औद्योगिक शाळा स्थापन करण्याचें ठरविलें आहे. शाळेच्या स्थापनेसाठी १,८३,००० रुपये खर्च येईल व ती येत्या नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष काम करूं लागेल. शाळेंत ८२ विद्यार्थ्यांची सोय करण्यांत येईल त्यांपैकी एक तृतियांश विद्यार्थ्यांना सरकार दरमहा २५ रुपये भत्ता देणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १ एप्रिल, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आम्हांला सवतीच्या मुलाप्रमाणें कां वागवतां ?

### श्री. भाभा ह्यांची सरकारच्या व रिझर्व्ह बँकेच्या पक्षपाती धोरणाविरुद्ध तक्रार

स्टेट बँक ऑफ इंडियाला सरकार आणि रिझर्व्ह बँक विशेष सवलती देते आणि इतर बँकांना सवतीच्या मुलाप्रमाणें वागविते, अशी तक्रार इंडियन बँक्स असोसिएनच्या वार्षिक सभेंत तिचे चेअरमन श्री. सी. एच. भाभा ह्यांनीं केली. गेल्या वर्षातील ठेवींमध्यें झालेल्या वाढीचीच गोष्ट घ्या. बाकीच्या बँकांकडील ठेवी हळूहळू वाढत गेल्या, पण स्टेट बँकेच्या ठेवींत मात्र प्रचंड भर पडली. भारत–अमेरिका कराराप्रमाणें साठलेले "काउंटरपार्ट फंड" सुमारें ३०० कोटी रुपयांच्या आसपास असून त्यांचा उद्देशाप्रमाणें वापर होईपर्यंत ते स्टेट बँकेंत ठेवले जावयाचे आहेत. बाजारांतील व्याजाच्या दरापेक्षा कमी दरानें हे फंड स्टेट बँकेकडे असल्यानें, स्टेट बँकेला त्या प्रमाणांत अन्याय्य फायदा मिळतो. ह्या सरकारी बँकेला त्यामुळें एक प्रकारची सबसिडीच मिळते. देशांतील इतर बँकांनाहि ह्या काउंटरपार्ट फंडाच्या ठेवींचा योग्य वाटा मिळावा, अशी दक्षता रिझर्व्ह बँकेनें घ्यावयास हवी होती. स्टेट बँक व इतर बँका ह्यांच्यांत केलेल्या भेदामुळें इतर बँकांच्यांत थोडा कडवटपणा निर्माण होणें अस्वाभाविक नाहीं. सरकारी सूचना व धोरणें ह्यांस अनुसरून बँकांनीं वागावें अशी सरकारची अपेक्षा असते. तेव्हां, अशा प्रकारची परिस्थिति निर्माण होऊं न देणें हें सरकारचें कर्तव्य ठरतें. रिझर्व्ह बँक ही पूर्णपणें सरकारची दासी नाहीं, हें दाखविण्यासाठी तरी तिनें एकट्या स्टेट बँकेला ( जिच्या शेअर भांडवलापैकी मोठा हिस्सा रिझर्व्ह बँक धारण करते. ) मलिदा देणें अप्रस्तुत आहे, असा स्पष्ट इषारा श्री. भाभा ह्यांनीं दिला. हे फंड बँकांत न्याय्य रीतीनें वाटले गेले, तर त्यांचा उत्साह वृद्धिंगत होईल; त्यांना सरकारी उपक्रमांबद्दल आत्मीयता वाटेल; तेढ निर्माण होणार नाहीं. स्टेट बँक आणि इतर बँका ह्यांना कसें भेदभावानें वागविण्यांत येतें, ह्याचें आणखी एक उदाहरण म्हणजे स्टेट बँकेच्या नोकरांना दिल्या जाणाऱ्या ग्रॅच्युइटीला इन्कम टॅक्स माफ करण्यांत आला आहे; बाकीच्या बँकांचे बाबतींत ग्रॅच्युइटी करमाफ नाहीं. सर्वच बँकांच्या नोकरांना ही करमाफी कां मिळूं नये ?

शाखावाढीचे आंकडेहि ह्याच भेदभावाची कथा सांगतील. १९५८ मध्यें शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ४१० ची वाढ होऊन त्यांची संख्या ३,४५५ झाली. १९५७–५८ मध्यें एकट्या स्टेट बँकेनेंच ११५ शाखा उघडल्या. त्यापूर्वीच्या दोन वर्षांत मिळूनहि एकूण १०२ शाखा तिनें उघडल्या होत्या. स्टेट बँकेच्या शाखांचा विस्तार योजनेनुसारच झाला आहे, पण तिच्या नवीन शाखांपैकी ९०% शाखा जेथें इतर व्यापारी बँकांच्या शाखा चालू आहेत, अशा ठिकाणींच खोलण्यांत आल्या. इतर बँकांनीं शाखा उघडण्याचे कामीं केलेले प्रयत्न आणि त्याग, ह्यांस त्यामुळें धक्का बसला आहे. स्टेट बँकेच्या शाखा-विस्ताराच्या पद्धतीमुळें हिंदी बँकिंगवर दुष्परिणाम होण्याचा संभव आहे. शेड्यूल्ड बँकांनीं कोठेंहि शाखा उघडण्यापूर्वी त्यांना रिझर्व्ह बँकेची आधी परवानगी घ्यावी लागते. प्रत्येक केंद्राची गरज लक्षांत येण्यासाठी रिझर्व्ह बँक कांहीं मूलभूत तत्त्वें पाळीत असेल, असें गृहीत आहे. इतर बँकांच्या कचेऱ्या जेथें कार्यक्षम रीतीनें चालू आहेत, अशा ठिकाणीं स्टेट बँकेनें कितीतरी शाखा उघडल्या आहेत; तेव्हां गेल्या ४–५ वर्षांत त्या ठिकाणीं शाखा उघडण्यासाठी व्यापारी बँकांनीं किती अर्ज केले होते व त्यांपैकी किती नाकारण्यांत आले होते; त्याचप्रमाणें स्टेट बँकेच्या अशा किती अर्जांपैकी किती नाकारले गेले, ह्याची आकडेवारी रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केली, तर सर्व खुलासा होईल !

## नेपा मिल्सला १,४०,००,००० रु. तोटा

मध्य प्रदेशांतील सरकारी मालकीच्या, न्यूजप्रिंट तयार करणाऱ्या नेपा मिल्सला तिच्या स्थापनेपासून ३१ मार्च, १९५७ अखेर १,४०,००,००० रु. तोटा आला. त्यांपैकी ७५,००,००० रु. तोटा सरकारी कर्जावरील व्याजाच्या पायीं झालेला आहे आणि ३८,००,००० रु. तोटा घसाऱ्यापायीं झालेला आहे. फॅक्टरीमधील न्यूजप्रिंट कागदाचें उत्पादन वाढत आहे. १९५७–५८ मध्यें दररोज सरासरीनें ४५·११ टन कागदाचें उत्पादन झालें; एप्रिल-जून १९५८ मधील तत्सम सरासरी ७७·१९ टन एवढी आहे. फॅक्टरीची उत्पादनशक्ति दररोज १०० टन उत्पादनाची आहे. भारताची गरज त्याच्या चौपटीइतकी आहे.

## भारतांत इंग्रजी पुस्तकांचें प्रकाशन सर्वांत जास्त

भारतांत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांतील इंग्रजी पुस्तकांचें प्रमाण वाढत चाललें आहे. १९५६ मध्यें एकूण ३७,११४ पुस्तकांचें प्रकाशन झालें, त्यांपैकी ३१% पुस्तकें इंग्रजी भाषेंतील होतीं. हें प्रमाण १९५७ मध्यें ४०% व १९५८ मध्यें ४५% झालें. १९५८ मध्यें प्रकाशित झालेल्या पुस्तकांत १२,४२२ इंग्रजी, ४,७३७ हिंदी, १,६४३ बंगाली, १,८२५ गुजराती, १,६१५ मराठी, १,२२० तामीळ, १,०९२ तेलगू आणि २९२ संस्कृत होतीं. मुंबई राज्यांत सर्वांत जास्त, म्हणजे ६,१९८ पुस्तकें प्रकाशित झालीं.

## हिंदुस्थान स्टील प्रायव्हेट लि. मधील 'प्रायव्हेट' शब्द गाळला

सरकारी मालकीचे तीन पोलादी कारखाने चालविण्यासाठी स्थापन झालेल्या कंपनीचें नांव आतां "हिंदुस्थान स्टील लिमिटेड" असें बदलण्यांत आलें आहे. 'पब्लिक' विभागांतील कंपन्यांच्या नांवांत 'प्रायव्हेट' हा शब्द विसंगत दिसतो, असें पं. नेहरूंनीं सूचित केलें होतें. कंपन्यांच्या रजिस्ट्रारच्या संमतीनें, मूळ नांवांतील 'प्रायव्हेट' हा शब्द आतां काढून टाकण्यांत आला आहे. रजिस्ट्रारनें कंपनी नव्या नांवानें नोंदली आहे.

### कोळशाच्या उत्पादनांत वाढ होण्याची शक्यता

भारतामधील खाजगी मालकीच्या कोळशाच्या खाणींतून १९५८ सालीं १९५५ च्या मानानें ५० लाख टन अधिक कोळसा बाहेर काढण्यांत आला. कोळशाच्या उत्पादनाचें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील उद्दिष्ट एक कोटी टनांचें ठेवण्यांत आलें आहे आणि उत्पादनाची सध्यांची गति लक्षांत घेतां १९६१ अखेर हें उद्दिष्ट गांठलें जाण्याची शक्यता दिसत आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागांतील कोळशाच्या खाणींमधून गेल्या वर्षी ५७ लाख टन कोळसा काढण्यांत आला. १९५५ च्या मानानें ही वाढ १२ लाख टनांची आहे. सार्वजनिक विभागांतील उत्पादनाचें उद्दिष्ट १·२ कोटी टन ठेवण्यांत आलेलें आहे. सिंघाराणी येथील कोळशाच्या खाणीचें उत्पादन सार्वजनिक विभागांत धरण्यांत आलें आहे. सार्वजनिक मालकीच्या कामकाजाची खाणींची व्यवस्था अद्याप पूर्ण झालेली नसल्यामुळें ह्या खाणींतून उत्पादन बेताचेंच होत आहे. बिहारमधील कोळशाच्या खाणीलगत आणि कोर्बा येथील कोळशाच्या खाणीलगत रेल्वेमार्ग टाकण्याची व्यवस्था चालू वर्षी करण्यांत येत आहे. आधींच्या कांहीं वर्षांपेक्षा गेल्या वर्षी कोळशाच्या वाहतुकीची व्यवस्था बरी होती. रोज कोळशानें भरल्या जाणाऱ्या वॅगन्सच्या संख्येंत ७ टक्क्यांनीं वाढ झालेली होती. तरीसुद्धां १९५८ सालीं कोळसाचें उत्पादन व त्याची वाहतूक ह्यांच्यांत ५० लाख टनांपेक्षा अधिक तफावत पडली. कोळशाच्या निर्यातींत घट झालेली आढळून आली. १९५७ मध्यें १७·५ लाख टन कोळसा निर्यात करण्यांत आला होता. १९५८ सालीं १६·४ लाख टन कोळसा निर्यात करण्यांत आला. जपान, सीलोन, सिंगापूर, हाँगकाँग ह्या देशांना पाठविण्यांत येणाऱ्या कोळशांत घट झाली. ब्रह्मदेश, पाकिस्तान व इजिप्त ह्यांनीं मात्र नेहमींपेक्षा अधिक कोळसा घेतला.

---

### चीनमधील छोट्या पोलादभट्ट्यांचा अभ्यास

जपान व चीनमधील पोलादाच्या कारखान्यांच्या उत्पादनपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारचें पांच जणांचें एक प्रतिनिधिमंडळ त्या देशांच्या दौऱ्यावर पाठविलें आहे. मंडळ जपानमध्यें एक आठवडाभर फिरेल व चीनमध्यें तीन आठवडे पाहणी करीत हिंडेल. गेल्या कांहीं महिन्यांत चीनमधील पोलादाच्या उत्पादनांत वेगानें वाढ झाल्याच्या वार्ता येत आहेत. चीनमध्यें मोठ्या प्रमाणावर पोलाद निर्माण करणारे कारखाने तर आहेतच; पण त्याशिवाय लहान लहान झोतभट्ट्यांच्या साह्यानें छोट्या प्रमाणावर पोलाद उत्पादन करणारे कारखानेहि आहेत. हे कारखाने दररोज ५ ते १० टन पोलाद निर्माण करूं शकतात; आणि ते मुख्यतः ग्रामीण भागांत वसलेले आहेत. पोलादाची निर्मिति छोट्या प्रमाणावर करणारे हे हजारों कारखाने स्थानिक साधनांचा उपयोग करून उभारण्यांत आले असून ते चालविण्यासाठी जवळ जवळ मजूर वर्गांत मोडणारा अकुशल कामगारहि चालू शकतो. पोलादाचे स्वयंपूर्ण कारखाने आतां चीन स्वतःच्या बळावरच उभारूं शकत असल्याच्या वार्ता आहेत. चीनमधील ह्या नव्या घडामोडींचा अभ्यास करून भारतांत त्याप्रमाणें कांहीं करतां येईल काय, ह्याचा अभ्यास मंडळ करणार आहे. भारतांत असे कांहीं भाग आहेत कीं त्या ठिकाणीं लोखंडाच्या खनिजाचा सांठा आहे. पण पोलादाच्या निर्मितीसाठी लागणारा दगडी कोळसा जवळपास मिळण्यासारखा नाहीं. चीनमधील छोट्या झोतभट्ट्या सर्व देशभर विखुरलेल्या आहेत. तेव्हां त्यांनीं हा कोळशाचा प्रश्न कसा सोडविला असेल अशी जिज्ञासा उत्पन्न होते. मंडळाच्या अभ्यासांत त्यावर प्रकाश पडल्यास ती माहिती भारताला फार उपयुक्त ठरेल. जपानमधील ५० ते १५० टन पोलाद रोज निर्माण करणाऱ्या कारखान्यांचीहि पाहणी मंडळ करील.

---

### तेलवाहतुकीचे नळ उत्पादन करणारें कॉर्पोरेशन

हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेंत खनिज तेलाचा पुरवठा ही बाब कच्च्या दुव्यासारखी आहे. देशाचें औद्योगीकरण जसजसें वाढत जाईल तसतशी खनिज तेलाची मागणीहि वृद्धिंगत होत जाणार आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन भारत सरकारनें देशाच्या सरहद्दींतच तेलाचा शोध नेटानें चालविला असून त्याला यश येण्याचीं चिन्हेंहि दिसत आहेत. मोठ्या प्रमाणावर तेल उपलब्ध झाल्यावर त्याच्या वाहतुकीची सोय करावीच लागेल. वाहतुकीचीं नेहमींचीं साधनें ह्या कामीं उपयोगीं पडणारीं असलीं तरी तेलवाहतूक नळांचे साह्यानें करणें हाच मार्ग सर्वांत अधिक प्रभावी असतो. पश्चिम आशिआंतील तेलउत्पादनाच्या केंद्रांतून ह्याच पद्धतीनें तेलाची वाहतूक करण्यांत येते. तेलाच्या वहातुकींतील ह्या मार्गाचें महत्त्व लक्षांत घेऊन भारत सरकारनें तेलाचे नळ तयार करण्यासाठी एक स्वतंत्र कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनची स्थापना रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्याच्या अनुषंगानें करण्यांत येणार असून त्यासाठी ३ कोटी रु. भांडवल लागेल. गोहाटी आणि बरौनी येथें तेलाच्या शुद्धीकरणाचे जे कारखाने उभारण्यांत येणार आहेत त्यांना अशुद्ध तेलाचा पुरवठा नळांच्या साह्यानें करण्यांत येणार आहे. आसाममधील तेलउत्पादक केंद्रापासून असे नळ टाकण्यांत यावयाचे आहेत. दोन्ही तेलकारखान्यांना पुरवठा करण्यासाठी सुमारें ७५० मैल लांबीचे नळ टाकावे लागतील, असा अंदाज करण्यांत आला आहे. नळांची सर्वच गरज भारतांत तयार होऊं शकणाऱ्या साहित्यानें भागविण्यासारखी परिस्थिति नाहीं. कांहीं प्रमाणांत तरी नळ परदेशांकडून आयात करावे लागतीलच. पण शक्य तितके अधिक नळ देशांतच तयार करण्याचा सरकारचा इरादा आहे.

---

### पाकिस्तानांतील दरमाणशीं उत्पन्नांत एक रुपया घट

मार्च, १९५८ अखेर संपलेल्या वर्षी पाकिस्तानांतील दरमाणशीं उत्पन्न एक रुपयानें घटून तें २५० रु. चें २४९ रु. झालें. राष्ट्रीय उत्पन्न मात्र २,०७८ कोटी. रु. चें २,०९८ कोटी रु. झालें. लोकसंख्या ११ लाखांनीं वाढून ती ८·४ कोटी झाली. शेतीचें उत्पन्न १७ कोटी रुपयांनीं घटलें, तर उद्योगधंद्यांचें उत्पन्न ९ कोटी रुपयांनीं वाढलें.

---

**थंड हवेचें नवें ठिकाण**—पंचमहाल जिल्ह्यांतील भावागड ह्या डोंगरी किल्ल्याचे थंड हवेच्या ठिकाणांत रूपांतर करण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. गडाची उंची समुद्रसपाटीपासून ३,००० फुटांपेक्षा अधिक आहे. त्यांपैकीं निम्म्या उंचीपर्यंत मोटारी जाण्यासारखा रस्ता आहे. ह्या ठिकाणाचा उपयोग बडोद्यामधील लोकांनाहि होईल.

## दि बेळगांव बँक लिमिटेडची वार्षिक सभा

### चेअरमन, श्री. गोविंदराव सराफ ह्यांचें भाषण

[ बँकेच्या २९ व्या वार्षिक सभेपुढें ता. २६ मार्च १९५९ रोजीं चेअरमन श्री. गोविंदराव सराफ यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश. ]

या सालीं औद्योगिक दृष्ट्या सुधारलेल्या पाश्चिमात्य देशांत आलेली आर्थिक मंदीची लाट अपेक्षेपेक्षा लवकर ओसरली तरी तिचे प्रतिकूल परिणाम कच्च्या मालाच्या निर्यातीवर अवलंबून असणाऱ्या अविकसित देशांना चांगलेच जाणवले. आयातीचे व निर्यातीचे दोन्ही दर अनुकूल नसल्यानें प्रतिकूल अटींवर व्यापार करावा लागला.

आपल्या देशासहि अशा मंदीची झळ चांगलीच जाणवली. परंतु कारणें मात्र थोडीं वेगळीं होतीं. पूर्वीच्या दोन वर्षांत नियोजनासाठी बराच मोठा खर्च होऊन गेल्यामुळें आलेला आर्थिक शीण त्यांत स्पष्टपणें दिसून आला. खासगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांतील विकासांत व उत्पादनांत वाढीचा अभाव, शेतीच्या उत्पादनांत घट, वाढती बेकारी व महागाई व मुख्यत: परदेशी हुंडणावळीची भीतिप्रद तूट यामुळें नियोजनाच्या भवितव्याविषयीं साशंकता निर्माण झाली. करांच्या वाढत्या ओझ्याखालीं व्यापारी वर्गांत निरुत्साह व औदासिन्यहि स्पष्ट होऊन महागाईमुळें कापड व सिमेंट यांचा उठाव कमी होऊन हे दोन मुख्य धंदे अडचणींत आले. परंतु श्री. मुरारजी देसाई यांचेकडे फडणिशी खातें आल्यापासून या परिस्थितींत अनेक दृष्ट्या अनुकूल घटना घडून आल्यामुळें आशादायक वातावरण पुन्हां दिसूं लागलें. विशेषत: मित्र राष्ट्रांकडून परदेशी हुंडणावळीबाबत जरूर ती मदत मिळून पुन्हां पुढील अडचणी दूर करण्याच्या योजनांची आंखणी होऊं लागल्यामुळें नियोजनाचा मार्ग सुकर झाला व मर्यादित स्वरूपांत तरी खाजगी क्षेत्रांत विकास साधण्याची शक्यता निर्माण झाली. वर्षअखेरीस सार्वजनिक क्षेत्रांतील दोन मोठे पोलाद कारखाने प्रत्यक्ष सुरू झाल्यानें आशेला बळकटी आली आहे.

बँकिंगच्या क्षेत्रांत अहवालाचें साल अनेक दृष्ट्या महत्त्वाचें म्हणावें लागेल. हिंदी बँकिंगच्या इतिहासांत पहिल्यांदाच शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींच्या आंकड्यांत प्रसारांतील एकूण चलनी नोटांपेक्षा वाढ दिसून आली. ही वाढ फारशी मजबूत नसली तरी आर्थिक विकासाच्या इप्सित दिशेनें झालेली ही प्रगति इष्टच म्हटली पाहिजे. दुसरा विशेष म्हणजे बँकांकडील चालू ठेवींत घट होऊन मुदत ठेवींचें प्रमाण वाढणें हा होय. या सालीं चालू ठेवींचें एकूण ठेवींशीं प्रमाण ५२% वरून ४४% पर्यंत खालीं आलें व मुदत ठेवींचें ४८% वरून ५६% पर्यंत वाढलें. याचीं कारणें, आयातीवरील निर्बंधांमुळें शिल्लक रकमांची वाढ व अल्पमुदतीवरील व्याजांचे आकर्षक दर हे होत. तिसरा विशेष म्हणजे सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवींमधील वाढ. याचें प्रमुख कारण सेव्हिंग्जवरील व्याजांचे दरांत २½% पर्यंत झालेल्या वाढीबरोबरच प्रमुख बँकांनींहि चेकनें रकमा काढण्याची केलेली सोय हें असलें तरी एकंदरींत जनतेमध्यें बँकिंगची संवय वाढीस लागल्याचेंहि निदर्शक आहे यांत शंका नाहीं.

अशा प्रकारें शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत या सालीं एकूण २१२ कोटींची भर पडली परंतु कर्जमागणी मात्र तेवढ्याप्रमाणांत झाली नाहीं. त्यामुळें गेलीं दोन वर्षें बँकांवर जो ताण पडला होता तो या सालीं बराच कमी झाला. याचीं मुख्य कारणें म्हणजे आयातीवरील कडक निर्बंध, औद्योगिक उत्पादनांत विशेष वाढीचा अभाव व धान्य, साखर इ. आवश्यक वस्तूंवरील कर्जाचें नियंत्रण हीं असून ऐन हंगामांत सुद्धां ६३% पेक्षा कर्जाचें प्रमाण जास्त नव्हतें. पूर्वीच्या सालीं हेंच प्रमाण ७४% पर्यंत होतें. तसेंच या सालांत हंगामाची सुरुवातहि उशिरा म्हणजे नोव्हेंबरचे अखेरीस होऊन एप्रिलचे अखेरीस तो ओसरला. त्यामुळें बँकांकडील रकमांची सवड पाहून सरकारनें नोव्हेंबर १९५७ मध्यें व एप्रिल १९५८ अखेरीस काढलेलीं कर्जें बव्हंशी बँकांनींच पुरीं केलीं. पैशाच्या अशा सवडीमुळें ट्रेझरी बिलाचीहि पद्धत पुन्हां अमलांत आली. बँकांकडील कर्जरोख्यांच्या गुंतवणुकींत या वर्षी एकूण २१० कोटींची भर पडली. म्हणजे या सालच्या ठेवीमधील सर्व वाढ सरकारी कर्जरोख्यांत गुंतविण्यांत आली. मागील सालीं ठेवीमध्यें २६० कोटींची वाढ होऊनहि बँकांची ही गुंतवणूक फक्त ४४ कोटींची झाली होती यावरून अहवालाचे सालीं बँकांना आपल्याकडील रकमा व्याजीं लावण्यास किती मर्यादित वाव राहिला हें स्पष्ट होतें.

अशा परिस्थितींतहि बँकांकडील ठेवींवरील व्याजांचे दर मात्र वरच्या पातळीवरच टिकून होते; इतकेंच नव्हे तर ठेवीसाठीं बँकांमध्यें पहिल्या सहामाहींत उघड चढाओढ चालली होती आणि त्याला आळा घालण्यासाठीच 'इंडियन बँक्स असोसिएशन' मार्फत सर्व बँकांत एक करार अमलांत आला आहे. तरी त्या मानानें ठेवींवरील व्याजांचे दर अद्याप टिकूनच आहेत.

याचें प्रमुख कारण, अल्पबचतींच्या योजनांवरील सरकारनें देऊं केलेले वाढते दर हेच होत. त्या अंदाजांतच बँकांना आपले दर ठेवणें भाग पडतें, तसेंच कर्जाला मागणी इतकी कमी असूनहि त्यावरील दरांत मात्र घट झाली नाहीं हें एक वैशिष्ट्य लक्षांत घेणें जरूर आहे. तरी एकंदरींत येणें व्याजांत घट होऊन बँकांच्या खर्चाचें सदैव प्रमाण वाढल्यामुळें बँकांच्या नफ्यांत अलीकडे पहिल्यांदाच घसरगुंडी दिसून येत आहे. नवीन सालांत बँकांपुढें जास्त बिकट समस्या उभ्या राहणार आहेत.

अशा परिस्थितींतहि आपल्या बँकेनें यंदा नफ्यामध्यें चांगलीच वाढ दाखविली आहे हें नि:संशय अभिमानास्पद आहे. याचें मुख्य कारण म्हणजे आमच्या शाखांची योग्य मांडणी व व्यापारी वर्गास आमच्या संस्थेविषयीं वाटत असलेली आत्मीयता हेंच होय. आमच्याकडील ठेवींतहि यंदा २२ लाखांची भर पडली तरी हंगामांत कर्जाचें व ठेवीचें प्रमाण ७६% पर्यंत राहून हंगामाचे अखेरीस तें ४५४% पर्यंत उतरलें हें ध्यानांत घेतल्यास आमच्या कर्जाची वांटणी सुरक्षितपणें करण्यांत येते हें स्पष्ट दिसून येतें. यंदा ठेवींमध्यें इतकी वाढ दिसून आली तरी त्यावरील व्याजाचे दर मोठ्या बँकांपेक्षाहि थोडे कमीच आहेत हें लक्षांत घेतां, ठेवीदारांच्या आमच्यावरील विश्वासाबरोबरच आम्हीं साधलेली प्रगति मजबूत पायावर आधारलेली आहे हें दिसून येतें. या सालीं कागवाड येथें नवीन शाखा उघडण्यांत आली असून तीहि इतर शाखांप्रमाणें लवकरच कार्यक्षम होईल अशी उमेद वाटते. नवीन सालांत आणखीहि कांहीं शाखांची भर घालण्याचें योजलें आहे. तसेंच वाढत्या ठेवींचें प्रमाण लक्षांत घेऊन शेअर-भांडवलामध्यें वाढ करण्याचा

आपल्या बोर्डाचा विचार आहे. आमच्या शेअर्सकरितां अनेक ठिकाणांहून मागणी होत असल्यानें शेअर भांडवलांत वाढ करून जास्त लोकांना संधि देण्याचे दृष्टीनेंहि हें योग्यच ठरेल. स्टेट-बँकेकडून उघडण्यांत आलेल्या शाखांचीं ठिकाणें हीं आमच्या विभागांत तरी बँकांची सोय असलेलींच अशीं असल्यानें अति-क्रमण व चढाओढीचें स्वरूप या व्यवहारास आल्याशिवाय राहत नाहीं. इतकें करूनहि या शाखांच्या व्यवस्थेकरितां होणारा खर्च व त्या मानानें होणारी जनतेची सोय हीं लक्षांत घेतां सार्वजनिक पैशाचा असा विनियोग इष्ट म्हणतां येईल काय याची शंका वाटते.

बँकेची प्रगति साधण्यांत सर्व अधिकारी व नोकरवर्गानें मनःपूर्वक सहकार्य देऊन जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानून व आपणां सर्वांचेंहि आभार मानून आपली रजा घेतों.

---

### साखरेचें उत्पादन वाढण्याची शक्यता

गेल्या एक-दोन वर्षांत उत्तरप्रदेशांतील साखरेचें उत्पादन कांहीं कारणांमुळें घटल्याचें दिसून आलें. तेव्हां दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस साखरेच्या वार्षिक उत्पादनाचें जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें तें गांठलें जाईल कीं नाहीं अशी शंका उत्पन्न होऊं लागली होती; परंतु कलकत्ता येथील साखरेच्या व्यापारी गटांत ह्यासंबंधीं आशावाद प्रकट करण्यांत येत आहे. पंचवार्षिक योजनेंत ठरविण्यांत आलेलें उद्दिष्ट २२,५०,००० टनांचें आहे. तें गांठण्यास फार अडचण पडूं नये असें ह्या गटाचें मत आहे. त्याच्या माहितीप्रमाणें १९५८ सालअखेर भारत सरकारनें ५१ नव्या साखर कारखान्यांना परवाने दिले आहेत. त्या सर्वांची मिळून ऊस गाळण्याची शक्ति ५३,६०० टनांची आहे. त्याशिवाय ६८ जुन्या साखर कारखान्यांना विस्तार करण्याची परवानगी देण्यांत आली होती. त्यामुळें त्यांची ऊंस गाळण्याची शक्ति ३५,३५९ टन होणार होती. १९५९-६० च्या हंगामांत ३६ साखर कारखाने प्रथमच प्रत्यक्ष उत्पादन करूं लागतील. त्यांचें साखरेचें उत्पादन ४,०५,००० टन होईल. ३९ जुन्या कारखान्यांनीं आपला विस्तार केल्या-मुळें त्यांचें साखरेचें उत्पादन २,७४,००० टन होईल. म्हणजे १९५९-६० अखेर १०,६०,००० टन साखर उत्पादन करण्याइतके परवाने देण्यांत आले असले तरी प्रत्यक्ष उत्पादन सुमारें ६,७९,००० टन होईल. कार्यक्रमाच्या अखेरच्या वर्षांत १,३५,००० टन साखर उत्पन्न करणारे अधिक कारखाने निघणार असल्यामुळें मूळचें उद्दिष्ट गाठतां येणें शक्य होणार आहे. उत्पादनाचें मूळचें उद्दिष्ट प्रथम २५,००,००० टन ठर-विण्यांत आलें होतें. पण परदेशीय चलनाच्या तुटवड्यामुळें तें २२,५०,००० टन म्हणजे २॥ लाख टनांनीं कमी करण्यांत आलें होतें.

---

मलबारमधील शेतकरी कर्जबाजारी — केरळमधील शेतकऱ्यांच्या डोक्यावर एकूण ३२·२९ कोटी रुपयांच्या कर्जाचा बोजा आहे. ह्या आंकड्यांत शेतमजुरांना असलेल्या कर्जाचा समावेश झालेला नाहीं. मलबारमधील शेतकऱ्याला सरासरी ६२५ रुपये आणि त्रावणकोर-कोचीनमधील शेत-कऱ्याला सरासरी ३०३ रुपये कर्ज आहे.


स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस-पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.
शाखा-मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, बार्शी, नासिक, लोणंद, कोल्हापूर, हलकर्णी, इचलकरंजी व फलटण.
लौकरच मुंबई दादर भागांत शाखा सुरु करणेंत येत आहे.

ता. ३१-१२-५८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४,४३,००० |
| ठेवी | रु. | १,५०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,७२,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·१५ | रु. ३·५० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४·००

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १·५० |
| चालू डिपॉझिट | " | ०·५० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ३४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवी-वरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | $2\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | $2\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | $3\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २. ता. ३१-७-५७
वा. ग. आळतेकर, कार्यकारी संचालक

## १९५९ मध्यें अन्नपरिस्थिति सुधारण्याची अपेक्षा

१९५८–५९ च्या खरीप पिकांच्या कापणीनंतर म्हणजे सप्टेंबर १९५८ नंतर अन्नधान्यांच्या किंमतीविषयक परिस्थितींत (विशेषतः तांदळाच्या) सुधारणा झाली. या वर्षांतील अन्नपिकांचें उत्पादन गेल्या कांहीं वर्षापेक्षा जास्त असून तांदळाच्या उत्पादनानें, उच्चांक गांठण्याची शक्यता आहे, असें मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्यांतील अन्न–विभागाच्या १९५८-५९ च्या वार्षिक अहवालावरून दिसून येतें.

या अहवालावरून १९५९ ची अन्नविषयक परिस्थिति उत्साहकारक असल्याचें दिसून येतें. अन्नधान्यांचा पुरवठा व किंमतीमान समाधानकारक राहण्याची आशा असून मंदीच्या कालांत विशेष अडचणी येणार नाहींत. जादा व तुटीच्या तांदूळ उत्पादन राज्यांत तांदळाचें अमाप पीक, १९५८ पेक्षा मोठ्या प्रमाणावर सरकारकडून धान्य खरेदीची अपेक्षा आणि त्यामानानें कमी प्रमाणांत वाटप करण्याची आवश्यकता, इत्यादींमुळें हा आशावाद निर्माण झाला आहे.

### तांदळाच्या किंमतींत घट

सप्टेंबर १९५८ पासून तांदळाच्या किंमतींत मोठ्या प्रमाणावर घट होत असून फेब्रुवारी १९५९ मधील तांदळाच्या किंमती फेब्रुवारी १९५८ पेक्षा बऱ्याच कमी असल्याचें या अहवालांत म्हटलें आहे.

तदनंतर १९५८–५९ च्या सर्वसाधारण चांगल्या परिस्थितीचा उल्लेख करून अहवालांत असें म्हटलें आहे कीं १९५७–५८ च्या शेतकी वर्षांतील अन्नधान्याचें उत्पादन सुमारें ६·७ दशलक्ष टनांनीं कमी होतें. हा आंकडा अलीकडील कांहीं वर्षांत सर्वांत मोठा आहे. उत्पादनांत याप्रमाणें घट झाल्यानें बाजारपेठेंतील अन्नधान्यांच्या पुरवठ्याचें प्रमाण बरेंच कमी झालें. १९५७ च्या उत्तरार्धापासून फेब्रुवारी १९५८ पर्यंत अन्नधान्यांच्या किंमती उतरत होत्या. त्यानंतर त्यांत वाढ होऊं लागून ही परिस्थिति सप्टेंबर १९५८ पर्यंत टिकली. ही परिस्थिति सुधारण्यासाठी सरकारनें आपल्याजवळील धान्य विक्रीस काढणें, विभागीय पद्धति लागू करणें, वायदेव्यवहारांस बंदी करणें, ठराविक किंमतीस धान्य खरेदी करणें, यांसारखे नियमनात्मक उपाय योजले.

### अन्नधान्यांची आयात

१९५८ च्या कॅलेण्डर वर्षांत सुमारें १२०·५ कोटी रु. किंमतीच्या ३१·७३ लाख टन अन्नधान्यांची आयात झाली. १९५७ मध्यें १६२·२ कोटी रु. किंमतीच्या ३५·८२ लाख टन अन्नधान्याची आयात झाली होती. गव्हाची आयात साह्य करारानुसार अगर उधारीनें माल देण्याच्या करारानुसार अगर संबंधित देशांशीं केलेल्या इतर खास व्यवस्थेनुसार करण्यांत आली.

### अंतर्गत खरेदी

या वर्षांतहि अंतर्गत धान्यखरेदीचा कार्यक्रम चालू राहिला. तदनुसार या वर्षांत ४,८२,००० टन तांदूळ, ७५००० टन भात व १७००० टन इतर अन्नधान्यें मिळून एकूण ५,७४,००० टन अन्नधान्याची याप्रमाणें खरेदी करण्यांत आली. १९५७ चा हा आंकडा २,९८,००० टन होता.

सदर वर्षांत मध्यवर्ती सरकारच्या सांठ्यांतून सुमारें २९ लाख टन गहूं, ७·११ टन तांदूळ व ०·८१ लाख टन भरडधान्यें देण्यांत आलीं. याच वर्षांत किरकोळ व्यापाऱ्यांस मध्यवर्ती सरकारी डेपोंतून अथवा राज्य सरकारांच्या गुदामांतून ३८·६२ लाख टन धान्याची विक्री झाली. १९५७ चा हा आंकडा २९·४९ लाख टन होता. १९५८ च्या सुरवातीला स्वस्त धान्याच्या दुकानांची संख्या ३४,००० होती. हा आंकडा या वर्षाअखेर सुमारें ४८,६०० वर गेला. मध्यवर्ती सरकारच्या तपासणी-नोकरवर्गानें या दुकानांतील गैरप्रकारांचीं सुमारें ४,००० प्रकरणें राज्य सरकारांस कळविलीं. त्यांतील २,६०० प्रकरणीं अंतिम हुकूम देण्यांत आले.

या वर्षाअखेर राज्य सरकारें व मध्यवर्ती सरकारकडे ५·२४ लाख टन गहूं, ३·०३ लाख टन तांदूळ व ०·८७ लाख टन इतर अन्नधान्यें मिळून एकूण ९·१४ लाख टन अन्नधान्य शिलकींत होतें.

### अन्नधान्यांचा सांठा व तपासणी

या वर्षाच्या सुरुवातीला अन्नखात्यानें एकूण ११·४१ लाख टन धान्यसांठा करण्याची व्यवस्था केली होती. त्यानंतर यांत वाढ होऊन हा आंकडा ऑगस्ट १९५८ मध्यें १५·०९ लाख टनांवर गेला. तथापि, डिसेंबर १९५८ अखेर हा आंकडा १२·५८ लाख टनांवर आला. अन्नधान्यांच्या राष्ट्रीय साठ्यासाठी गुदामें इत्यादि बांधण्याचा कार्यक्रम जोमदार करण्यांत येऊन आणखी ७६,००० टन अन्नधान्याचा सांठा करणारीं गुदामें बांधण्यांत आलीं.

### साखरेचें उत्पादन व निर्यात

साखर-उत्पादनाची परिस्थिति या वर्षांत सर्वसाधारणतः समाधानकारक असल्याचें या अहवालांत म्हटलें आहे. १९५७-५८ मध्यें उसापासून १७·७९ लाख टन साखरेचें उत्पादन झालें. हा आंकडा १९५६–५७ पेक्षा ५०,००० टनांनीं कमी आहे.

साखर निर्यात वाढ वटहुकुमानुसार ३१ डिसेंबर १९५८ पर्यंत एकूण ५०,००० टन साखर निर्यातीसाठी मोकळी करण्यांत येऊन या साखरेची विक्रीहि झाली. या वर्षांत साखरेची आयात करण्यांत आली नाहीं. १ नोव्हेंबर १९५७ ला ४,३५,००० टन साखर शिलकींत होती. १९५६–५७ चा हा आंकडा ५,३३,००० टन होता. ५४ नवे कारखाने व १२ सहकारी संस्था स्थापून आणि सध्यांच्या ६९ कारखान्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ करून साखर उत्पादनशक्ति १० लाख टनांनीं वाढविण्यांत येणार आहे. यासाठी यापूर्वीच परवाने देण्यांत आले आहेत. परकीय चलनाच्या अडचणीमुळें जादा परवाने देण्याच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचा वेग खालीं आला.

खांडसरी व गुळाच्या वायदेबाजारावरील बंदी नियमनाशिवाय या वस्तूंच्या किंमतीवर आणि वांटपावर या वर्षांत कोठल्याहि प्रकारचें नियंत्रण घालण्यांत आलें नाहीं. ऑक्टोबर १९५८ अखेर ३२,३७७ टन गुळाची निर्यात झाली.

---

**मिऱ्यांच्या निर्यातींत घट**—गेल्या कांहीं वर्षांत भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या काजूगरांत वाढ होत आहे. परंतु मिऱ्यांच्या निर्यातींत मात्र घट होत आहे. इंडोनेशिआ व सारावाक ह्या देशांत मिऱ्यांची पैदास अधिक चांगल्या रीतीनें होत आहे. त्यामुळें त्या देशांतून मिरी वाढत्या प्रमाणावर निर्यात होऊं लागली आहे.

## पुणें हें शहर नसून सहा लाखांचें खेडें आहे !

### उद्योगधंद्यावर उन्नति अवलंबून

"पुणें हें विद्येचें माहेरघर आहे आणि पुणें शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे. पुण्याची लोकसंख्या सहा लाखांच्या घरांत आहे. पण परप्रांतांतून आलेल्या लोकांना दाखविण्यासारखीं व पुण्याचें वैभव प्रकट करणारीं फार थोडीं ठिकाणें या शहरांत आहेत, याचा मला नेहमीं खेद होतो. जास्तींत जास्त महाविद्यालयें काढून आणि पेन्शनरांची संख्या वाढून या शहराची वाढ तर होणार नाहींच; पण महानगरपालिकेचें उत्पन्नहि वाढणार नाहीं. त्यामुळें गांवाची उन्नति होणार नाहीं. या शहरांत अधिकाधिक उद्योगधंदे काढले, तरच शहराची वाढ होईल. या शहरांत बाहेरच्या प्रांतांतील लोकांचा पैसा कसा येईल, याचाच विचार केला पाहिजे.

### कारखाने निघावेत

"औद्योगिक वसाहत स्थापन केली म्हणजे पुणें महानगरपालिकेची जबाबदारी संपत नाहीं. या शहरांत असें एक आकर्षक वातावरण निर्माण झालें पाहिजे कीं, पुण्यांत कारखाने काढण्यासाठी कारखानदारांनीं पुण्याकडे धांव घेतली पाहिजे. कारखाना सार्वजनिक क्षेत्रांतील असो किंवा खाजगी क्षेत्रांतील असो, पण पुण्यांत कारखाना काढणें अत्यंत सोयीचें आणि किफायतशीर आहे, असें प्रत्येक कारखानदाराला वाटलें पाहिजे.

### कारखानदारांपुढील अडचणी

"परराष्ट्रांतील अनेक उद्योगपती पुण्यांत आले म्हणजे मला पुण्याविषयीं माहिती विचारतात. पण पुण्यांत नवा कारखाना काढण्याच्या मार्गातील अडचणी त्यांच्या लक्षांत आल्या म्हणजे ते बिचकतात आणि परत जातात. येणाऱ्या-जाणाऱ्या मालावर घेतली जाणारी जकात, अपुरी आणि महाग वीज आणि अत्यंत महागडे जागेचे भाव, यामुळें पुण्यांत कारखाना काढण्यास सहसा कुणी धजत नाहीं.

"या सर्व अडचणी दूर झाल्या तर अजूनहि वेळ गेलेली नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा उत्तरार्ध सुरू झालेला असला तरी तिसऱ्या योजनेंत देशाच्या औद्योगिक नकाशावर पुण्याला महत्त्वाचें स्थान अजूनहि मिळणें शक्य आहे.

### बसचे महाग दर

"शहराचा विकास आणि विस्तार होण्यासाठी अत्यंत स्वस्त दराची वाहतुकीची सोय उपलब्ध असावी लागते. मुंबईत ट्रामनें एक आण्यांत वाटेल तेथें जातां येतें. न्यूयॉर्क, लंडन, इत्यादि शहरांत एक आण्यांत ३०–४० मैलांचा प्रवास करतां येतो. पण त्या मानानें पुण्यांतील बसची वाहतूक अत्यंत महाग आहे. आमच्या कारखान्यांतला कामगार या बस-वाहतुकीचा उपयोग करूं शकत नाहीं. कारण त्यामुळें त्याला महिन्याला १५ रुपये खर्च येईल. बस-वाहतूक सध्यापेक्षा अधिक स्वस्त झाली, तर कामगार दूर दूर राहाण्यास जाईल आणि पर्यायानें राहण्याच्या घरांचा टंचाईचाहि प्रश्न सुटेल. कामगारांना सायकलवरून रोजगाराच्या ठिकाणीं जावें लागतें व आपली राहण्याची जागा शक्य तितक्या जवळ असावी, अशी काळजी त्यांना घ्यावी लागते. बसचे दर कमी करून कॉर्पोरेशनला ही गोष्ट साधतां येईल.

### औद्योगिक समिति नेमावी

"आपलें उत्पन्न कसें वाढेल एवढीच विवंचना महानगरपालिकेला लागलेली असेल, तर आज ना उद्यां उत्पन्न वाढविण्याची मर्यादा संपणार आहे. आज उत्पन्न वाढविण्याचे मार्ग खुंटले असले तर उद्यां उत्पन्न घटण्याचाहि धोका संभवतो. म्हणूनच, आपलें उत्पन्न वाढविणें एवढाच विचार करून चालणार नाहीं. लोकांचें उत्पन्न कसें वाढेल, याचाहि कॉर्पोरेशननें विचार करण्यासाठीं महापालिकेचे सभासद आणि अधिकारी, शहरांतील उद्योगपति आणि व्यापारी, कामगार पुढारी, वगैरेंची एक प्रातिनिधिक, औद्योगिक आणि आर्थिक सल्लागार समिति नेमावी. पुण्याच्या महानगरपालिकेनें या कामीं पुढाकार घ्यावा. अशी एखादी समिति नेमून सर्व क्षेत्रांतील लोकांचें सहकार्य संपादन करावें. पुण्याचें खरेंखुरें शहर होईल. आजचें पुणें शहर हें शहर नसून सहा लाख लोकांचें खेडें आहे. त्याचें एक उत्तम उदाहरण म्हणजे कांहीं वस्तु खरेदी करण्यासाठी मुंबईला पळावें लागतें. पुण्यांत सर्व वस्तू मिळूं लागल्या पाहिजेत. असें झालें तर पुण्याचें एका भव्य, वैभवशाली शहरांत रूपांतर होईल." — पुणें नगरपालिकेच्या नवव्या वर्धापन दिनाच्या अध्यक्षस्थानावरून श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनीं केलेलें भाषण.

---

## नियोजनावरील अंधविश्वासाचे दुष्परिणाम

### दिवाळखोरी लपविण्याचे सरकारचे प्रयत्न : चक्रवर्ती राजगोपालाचारींचा इषारा

"सध्यां चालू असलेलें नियोजन भारताला दिवाळखोरीकडे नेत आहे. सरकारनें वेळींच आपली चाल बदलावी. 'नियोजनाला एकदा प्रारंभ केला कीं, थांबतां येत नाहीं,' असें पं. नेहरू म्हणतात; दिवाळखोरीकडे खेचला जाणारा माणूसहि परत येऊं शकत नाहीं. जुन्या, स्वातंत्र्यपूर्व काळांत, अंदाजपत्रकांत दोन प्रकारचे खर्च होते. चार्जड्—असेंब्लीच्या अधिकाराबाहेरचे खर्च व व्होटेड—असेंब्लीच्या अधिकारांतील खर्च. सध्यांच्या अंदाजपत्रकांतील खर्चाच्या बहुतेक सर्व बाबी नियोजन मंडळानें 'चार्जड्' केल्यासारख्याच आहेत. नियोजनाला आतां देव मानण्यांत येऊं लागलें आहे; त्याचें स्वरूप अतर्क्य आहे, तें सर्वव्यापी आहे आणि टीकेच्या पलीकडे आहे. लोकांनीं स्पष्टपणें आपलें मत सांगून सरकारचा बहिरेपणा घालवला पाहिजे. आतां राज्यांचे मुख्य प्रधानहि पंतप्रधानांच्याप्रमाणें बोलूं लागले आहेत; मला वाटलें तो फक्त पं. नेहरूंचाच सर्वाधिकार होता ! तुटीच्या अर्थव्यवस्थेचे परिणाम अतिगंभीर होतील. शेतीवरील आणि इतर उत्पन्नावरील मर्यादेच्या घोषणा आगामी दिवाळखोरी लपविण्यासाठी केल्या जात आहेत."

---

### पाकिस्तानांतील डॉक्टरांना लष्करी नोकरीची सक्ति

पाकिस्तानांतील मेडिकल कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला तीन वर्षें लष्करांत नोकरी करावी लागेल असें पाकिस्तान सरकारनें ठरविलें आहे. त्यानंतर सात वर्षांनीं पुनः त्याला रावळपिंडीला आणखी लष्करी नोकरीसाठी पाठविलें जाईल. विद्यार्थिनींना हा नियम लागू आहे किंवा नाहीं, ह्याचा खुलासा झालेला नाहीं.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.